२.

# तिरकूट

- आनंद यादव

**परिचय -**

आनंद रतन यादव (१९३५ - २०१६ )

जन्म - कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे.

ग्रामीण जीवनाशी जवळीक साधणारा लेखक. कथा, कविता, कादंबरी, ललितगद्य, समीक्षा इ. अनेक साहित्यप्रकारांमध्ये लक्षणीय स्वरूपाचे लेखन करणारे एक महत्त्वपूर्ण लेखक म्हणून आनंद यादव यांचे नाव मराठी वाचकांना सुपरिचित आहे. वैविध्यपूर्ण आणि कसदार साहित्य लिहिणारे फार थोडे लेखक मराठी साहित्यात आहेत. त्यांच्यात यादवांची गणना करावी लागते.

'खळाळ', 'घरजावई', 'माळावरची मैना', 'आदिताल', 'डवरणी', 'उखडलेली झाडे', 'झाडवाटा', 'भूमिकन्या', 'शेवटची लढाई', 'उगवती मने' इत्यादी कथासंग्रह; तर 'गोतावळा', 'नटरंग', 'एकलकोंडा', 'माऊली', 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती', 'काचवेल', 'कलेचे कातडे', 'लोकसखा ज्ञानेश्वर', 'संतसूर्य तुकाराम' इत्यादी कादंबऱ्यांचे लेखन; 'हिरवे जग', 'मळ्याची माती' हे कवितासंग्रह; 'मायलेकरं' हा दीर्घ कवितासंग्रह; 'मातीखालची माती' हा व्यक्तिचित्रसंग्रह तर 'रात घुंगुरांची ' हे वगनाट्य तसेच 'स्पर्शकमळे', 'पाणभवरे', 'साहित्यिकाचा गाव' हे ललित लेखसंग्रह; याशिवाय अन्य लेखनप्रकारांत त्यांची विपुल लेखनसंपदा आहे.

प्रस्तुत कथा त्यांच्या 'घरजावई ' या कथासंग्रहातून घेतलेली असून त्यात तिळी मुले जन्माला आल्यामुळे ओढवलेल्या प्रसंगाचे वर्णन आले

आहे. घरातील सर्वच कुटुंबीयांना वाटते, वेगवेगळ्या सदस्यांनी वेगवेगळा नवस केल्यामुळे दोन मुले आणि एक मुलगी जन्माला आली. या एकूणच परिस्थितीचे दर्शन 'तिरकूट'मधून घडते.

---

**सात** बाळंतपणं झाली; पण जना म्हातारीला असा अनुभव कधी आला नव्हता; पण चौथ्या लेकीच्या सुनेचं काहीतरीच चाललं होतं. पहाटेपासनंच तिनं आरडाओरडा करायला घातला होता.

"आत्ता? काय म्हणायचं तरी हे ! जगात काय हीच बाळत हुतीया का काय? आमचीबी बाळतपणं झाल्यात म्हणावं."

"अहो, अंगापरास बोंगा दांडगा करायची खोडच हाय तिला. चांगली म्हस आरडल्यागत आरडू दे; चला." जावाजावा एकमेकींत बोलत होत्या.

मंजा आत आरडतओरडत आधनंमधनं परसूला शिव्या घालत होती. परसू शिव्या ऐकत बाहेरच्या सोप्यात येडबडून बसला होता. अपराध्यासारखं आधनंमधनं डोसकं खाजवत; 'आयला बैदाच झाली म्हणायची' असं स्वत:शीच पुटपुटत होता. एखादी गोष्ट धाडस करून; चोरून करावी आणि ती अचानक उघडकीस यावी व सगळ्यांनी पकडून चावडीत आणून बसवावं असं झालं होतं. तो उगंचच येणाऱ्या-जाणाऱ्या माणसांचं तोंड चुकवत होता. कुणाशी कित्येक वेळा काहीतरी बोलत होता.

"वैनी, ढोरांची शेणं अजून पडल्यात."

"भरते की आता." वहिनी.

"त्या भाड्याला पटकी आली, त्येला ! देवा रं ! आता जवळ तरी येऊ दे म्हंजे सांगते." मंजा आतून ओरडायची. अचानक परसूच्या मुस्काटात मारल्यागत व्हायचं. वहिनी खुसखूस हासून निघून जायची.

घर भरलेलं होतं. थोरल्या तिघा भावांना एक-दोन, एक-दोन पोरगेच होते. ती पोरं घरातनं इकडनं तिकडनं सकाळची गडबड करीत होती.

"आई चड्डीची नाडी सोड."

"आले."

“लवकर ये.”

“इकडं ये सोडते.”

“आगं, तूच इकडं ये लवकर.”

एकाकडं आई पळत होती, तवर दुसरं आटपून येऊन “चड्डी घाल ये” म्हणून हाका मारत होतं. तिसरं शेंबडात अडकून पडलं होतं “शेंबूड काड, ये की आई.”

“आले की माझ्या सुडक्या. किती छळतंस ?”

असं भरलेलं घर होतं. त्यात आता मंजाच्या पोराची भर पडणार होती. येणाऱ्या-जाणाऱ्या माणसांची तोंडं आणि बायकोच्या शिव्या चुकवाव्यात म्हणून परसू म्हशीच्या गोठ्यात गेला. म्हैसही तिथं खुंट्याभोवती फिरत घाणा घालत ओरडत होती. दावणीतली वैरण तिनं सगळी घाण करून टाकली होती. समोरचं रेडकू तिच्याकडं बघून सूर धरून ‘वाँ ऽ ऽ ऽ य’ करून ओरडत होतं. परसूनं म्हशीपाठीमागची काठी घेऊन, म्हशीच्या पाठीत चारपाच काठ्या घातल्या. म्हातारीनं हे बघितलं. दुधाच्या म्हशीला परसू मारताना ती धावत आली.

“काऽरं परसू?”

“उगंच वरडाय लागलंय न्हवं मघाधरनं.”

“आरं दुभत्याची म्हस हाय ती. रेडकासाठी वरडत असंल-- तू चल बघू सोप्यात. बस जा तिथं जाऊन.”

तोवर एक सुईण देवघराच्या खोलीचं अर्धं दार उघडून बाहेर आली. म्हातारी तिच्याकडं धावत गेली.

“पोरगा का पोरगी सत्तू?”

“पोरगा हाय.”

“आरं देवा ! एखादी तरी पोरगी देवानं देऊ ने हुती काय गं ह्या घरात?”

“आगं, एक-एकजण सतरा नवसं करत्यात तर पोरगा हुईत न्हाई आणि तुला काय झालं एवढं वंगाळ वाटायला?”

“आगं, समदं घर भरलं की या खोंडांनी! मला सात ल्याकच. ह्या सुडक्यांस्नीबी गंड पोरंच. काय म्हणू तरी काय हे!”

"थोर नशिबाची हाईस."

"म्हण बाई - बाळतीण कशी हाय?"

"काय कळत न्हाई!"

"काय कळत न्हाई?"

"अजून पोटात कळ करतीया म्हणं."

"आता काय म्हणायचं ह्या भोगाला?"

सत्तू चिंध्यांचं गाठळं घेऊन आत गेली. म्हातारी लगालगा दत्ताच्या देवळात गेली. परसू पोटात कळ आल्यागत जास्तच आखडून बसला... पोरगा झाला, खरं बायकूच्या पोटात अजून चावाय लागलंय. आणखी काय हुतंय वाटतं. आयला, पहिल्याच पेटाला दोन. घोटाळा हुणार समदा. तरीच तिचं पोट रांजणागत दांडगं दिसत हुतं!

म्हातारीनं सुनंचं पोट उभार दिसताच, तिला आळसिद्धी आप्पाच्या वाडीला नेऊन देवीची वटी भरली होती. देवळाची पायरी चढताना सुनेला नवस बोलायला सांगितलं.

"मंजा, पोरगी होऊ दे म्हणून देवाजवळ मागणं माग गं. घरात समदी पोरंच हाईत. मलाबी ल्याकच झालं. लेकांस्नीबी ल्याकच. निदान तूतरी देवाजवळ लेक मागून घे. कौतिक हुईल तुझं आणि तुझ्या लेकीचं. घरात आंब्याबरोबर चिंचबी पिकलेली असावी, लेकी."

सासूबाई, आमच्या बाऽला पाचजणी आम्ही लेकीच हाय. पोरीचं कौतिक घरात न्हाई आमच्या. तसल्यात मलाबी पोरगीच झाली तर बा म्हणंल; "हीबी कारटी आपल्या आईगत पांढऱ्या पायाची निघाली."

""आगं, परसूकडं ध्यान ठेव. तुझ्या बाऽचं कशाला घेऊन बसतीस? परसूला पोरीचं लई लाड हाईत."

"त्ये कुठलं ? त्यांस्नीबी पोरगाच पाहिजे हाय नि."

"न्हाई गं. मला सांगितलंय त्येनं तर."

"मलाबी सांगितलंय पोरगाच मागून घे म्हणून."

"तुझ्या कल्याणाचं सांगतेय मी. मुकाट्यानं पोरगी घे मागून."

"अहो, देव तरी पहिल्याच पेटाला पोरगी मागताना काय म्हणंल ? दुसऱ्या डावाला बघू म्हण पोरीचं. बंसाला पहिला पोरगा असू दे."

देवाच्या साक्षीनं दोघींचं खटकलं. पितळेच्या डोळ्यांनी तो हे सगळं बघत होता... मनातल्या मनात हसत होता.

पायऱ्या चढून दोघीजणी वर गेल्या. दोघींनीही देवाची वटी निरनिराळी भरली. दोघींनी दोन नारळ फोडलं. प्रदक्षिणा घातल्या आणि देवाच्या उंबऱ्यावर एकेकीनं डोकं ठेवून निरनिराळा नवस मागून घेतला. सवतं-सवतं नवसाचं घोडं वहायचं कबूल केलं.

"बाबा, आळसिद्ध आप्पा, निदान ह्या वक्ताला तरी माझ्या घरात नातीचं पाऊल पडू दे. एवढं माझं ऐक. तुला पितळेचं घोडं व्हावते.'

"बाबा, आळसिद्ध आप्पा, माझ्या वंसाचा येल वाढू दे. मला पोरगा होऊ दे. तुला पितळेचं घोडं व्हाईन.'

"आळसिद्ध आप्पाच्या नांवानं चांगभलं ऽऽऽ" असं म्हणून दोघींनीही देवाचा भंडारा कपाळाला माखला. दोघीही आपापलं सवतं घोडं दामटून परत आल्या. घराकडं आल्यावर म्हातारीनं परसूसंगट कडाक्याचं भांडण काढलं. बायकोच्या गरोदरपणाची जाहीर चौकशी त्याला नको होती. म्हातारी तर देवाकडं जाऊन नवं तोंड बसवून आल्यागत खणाखणा बडबडत होती.

"ही तुझ्या पोटचं गरवार हाय का आणि कुणाच्या?"

परसू एकदम चरकला, 'काय झालं?"

"आरं, ह्या भवानीला तुझ्यापरास माह्यारच्या माणसांची लई काळजी दिसतीया."

"हे बघ; सरळ काय ते सुधरून सांग. घालून-पाडून बोलू नगं."

"आरं, देवाजवळ पोरगी मागून घे म्हटलं तर ही भवानी म्हणतीया-पोरगाच मागून घेते, माह्याराकडं बाऽला एकबी पोरगा न्हाई. तवा म्हटलं; हे हुणारं मूल तुझ्यासाठी का माह्यारच्या माणसासाठी?"

"ह्यातलं मी काय सांगणार आता ! ते तुमचं तुम्ही बघा. उगंच सोप्यात बसून न्हाई त्या गोष्टीसाठी भांडणं नगंत."

"वाव्वा रं निमताळ्या. मला कळत न्हाई व्हय हे बोलणं ? सुडक्या, काल आलेली बायकू आणि आज तिच्या सोधीन झालास व्हय तू ? बापयाच्या जन्माला आलाईस का आणि कुणाच्या?"

"उगंच तोंडाला येईल ते बडबडू नगं. तुमचं तुम्ही बघा जावा; न्हाईतर पडा जावा खड्ड्यात. मला त्यातलं काय सांगू नका."

म्हातारीनं सुनंला मग चांगलंच बघायचं ठरवलं. सुनंच्या मनातपण भलताच पाप-संशय आला होता. तिला वाटलं, सासूचा डाव असावा... आपण सासूची नावडती म्हणून आपणाला पोरीच हव्यात असं तिला वाटतंय. देवा भगवाना, बघून घे रं, बाबा. चांगलं दोन-दोन ल्याक होऊ देत मला एक एक वक्ताला.

परसूचे कानही तिनं भरविले. परसूलाही ते पटलं. त्यालाही पोरगाच व्हावा असं वाटलं. लग्नही नुकतंच झालेलं असल्यामुळं त्याला बायकोचं सगळं खरंच वाटत होतं. वंशाला एखादा तरी मुलगा असावा, मग पाहिजे तर पोरी झाल्या तरी चालतील अशी त्याची खात्री पटली. एक दिवस पहाटे तो उठून आळसिद्ध आप्पाच्या वाडीला जाऊन नवस मागून आला- "बाबा भगवाना, पोरगाच होऊ दे रं बाबा. तुला पितळेचा घोडा व्हाईन बघ." व्यवहार पुरा झाला.

आळसिद्ध-आप्पाचं देवस्थान मोठं जागृत. अनेकजण त्याला कौल लावत असत. नवस बोलत असत. ह्या देवानं भक्तांना भरपूर दिलेलं आहे अशी त्याची कीर्ती आहे. त्याच्या खुणा त्या देवाच्या पुढ्यात आहेत. पाच-पन्नास पितळेचे लहान-मोठे घोडे त्याच्यापुढे आहेत. दारातल्या पायऱ्यांतून रुपये, अधेल्या, पावल्यांची बारीक-मोठी, जुनी-नवी नाणी मारलेली आहेत. ह्या देवाला नवस करून परसू परत आला, तेव्हा कुठं त्याचं पोट भरल्यागत झालं.

...आणि आज पहाटेपासनं घरात मंजाच्या बाळंतपणाची गडबड उडाली होती. बाळंतपण कुचंबत होतं, म्हणून एकाला तीन सुईणी बोलावून आणल्या. म्हातारीही चिंतागती झाली होती. दत्ताजवळ मनोमन धरणं धरून बसली. एक मुलगा झाल्यावर पुन्हा पोटात कळा करू लागल्या म्हणून मंजाच्या ऐवजी परसूच्या पोटात कालवाकालव होऊ लागली. तो आतल्या आत विव्हळू लागला.

आणि परसूचा असाच एक तास तळमळत गेल्यावर, मंजाला पुन्हा दुसरा मुलगा झाल्याची दुसरी वार्ता दुसरी सुईण घेऊन आली. तवर पहिलीनं

पहिल्याची नाळ कापून, त्याला आंघोळ घालून फडक्यात गुंडाळून ठेवले होते. चिंतागती झालेली म्हातारी, पुन्हा दुसराही मुलगाच झाला म्हणून जास्तच खट्टू झाली. परसूला तर गळ्याएवढ्या चिखलात रुतल्यागत झालं.

दुसरा मुलगा झाल्यावर तर मंजाच्या पोटातल्या कळा जास्तच वाढल्या. म्हातारीनं लगालगा देवघरातली माळ आणली आणि ती ओढत बसली. परसूचे हात-पाय गळून गेले. शक्ती नाहीशी झाल्यासारखं त्याला वाटू लागलं. तो आता चिखलात पुरा बुडला... जाणारी-येणारी माणसं मात्र त्याच्याकडं मिस्कीलपणानं बघत होती.

बरोबर बारा वाजता तिसऱ्या मुलाचा टाळा बाहेर ऐकायला आला. सुईणी घामानं नहात होत्या. मंजा मजबूत बायकू म्हणून टिकली होती. घरभर सगळी गडबड उडाली. जे-ते माणूस आतनं हादरलं होतं. एका दिवसात परसू तीन औरस मुलांचा बाप झाला होता... परसूला अजून मुसरूडच होतं, पण आता त्याला मिशा येऊन 'पिकून' पांढऱ्या झाल्यासारखं वाटू लागलं. म्हातारपणानं हातापायातलं बळ जावं; तसं तो चालू लागला.

"तिळं झालं व्हय गं सत्तू?"

"तिळं झालं बाई. परसू भाग्याचा हाय बघ. गावातला दत्त पावला त्येला. दोन पोरगं, एक पोरगी."

म्हातारीला दुःखात सुख वाटलं. परसूला तर ही तिन्ही पोरं उठून आपल्या दोन्ही काखांत दोनं, आणि एक मानगुटीवर बसलंय; असा भास होऊं लागला. तो उठून स्वैंपाकघरात पाणी प्यायला गेला.

खोलीत एकाच्या ठिकाणी दोन बाजली पडली. दोन शेगड्या. रोज तीन हंडे पाणी तापू लागलं. बाळंतिणीला तापायचं ते वेगळंच - मूल रडतंय म्हणून मंजा झोपेतनं उठायची. जवळ जाऊन बघायची तर कोणतं रडत होतं पत्ता लागायचा नाही. एकाला पाजवून मधनंच उठून गेली आणि पुन्हा परत आली तर कोणत्याला पाजलं, कोणत्याला नाही; हे कळायचं नाही. मग पुन्हा ती फिरून, तिन्हींनाही पाजायची... एकदा तर सुईणीनं एकाच मुलाला दोनदा आंघोळ घातली म्हणं.

बारशासाठी खास पाळणा करून आणला. जवळजवळ एक बाजलंच

उलटं करून बांधल्यासारखं वाटत होतं. तिघांना तीन आंगडी-टोपडी शिवून आणली. 'पाच त्रिक पंधरा कुवारणी पुजल्या. सकाळी सुरू झालेलं बारसं संध्याकाळी संपत आलं.

परसूनं तर मुलांची तोंडंच बघितली नव्हती. मुलांनीही त्याला तोंड वर काढू दिलं नव्हतं. मुलं मोठ्यानं रडायची आणि परसू आतल्या आत रडकुंडीला आलेला असायचा. 'असं कसं झालं' म्हणून येडबडून बसायचा.

दिवस जातील तसं मंजा हळूहळू घरातनं फिरू लागली. तूप-भात खाऊ लागली. परसू मात्र अवघडल्यासारखा झाला. घरातनं बाहेर जावं असं त्याला वाटत नव्हतं. गरोदरपणातल्या बाईसारखं त्याला अन्नही जाईना.

एक दिवस म्हातारीनं त्याला मळ्याकडं तरी जाऊन ये; म्हणून सांगितलं. म्हणून तो कोवळ्या, न्याहारीच्या वक्ताला बाहेर पडला. रस्त्यात ओळखीची माणसं भेटू लागली.

"काय परसू, बायको बाळंत झाली म्हणं?"

"झाली की."

"पोरगा का पोरगी?"

"दोन्हीबी."

"म्हंजे आवळी-जावळी दोन झाली काय रं?"

"व्हय."

"काय खोटं बोलतोस, मर्दा. तीन पोरं झाल्यात म्हणं नि तुला." असं म्हणून, विचारणारा फिदीफिदी हासत निघून जाई.

परसूच्या वारगीचा हन्या त्याला पाण्याला जाताना भेटला. "आवळी-जावळी दोन पोरं झाली व्हयं रं परशा तुला?"

"दोन न्हाई तीन."

"तीन ? आणि एक दिसात?"

"सुक्काळीच्या, तर काय बायका दोन दिवस बाळंत हुईत असत्यात?'

"आरं मर्दा, एकाएकाला पाच पाच वर्षांत तीन पोरं हुईत न्हाईत. आणि तुला एका दिवसात तीन पोरं. माणूस हाईस का कोण रं?" हन्या कावड घेऊन निघून गेला.

शिवा पवार गावातला सगळ्यात खोडील माणूस. त्यानं परसूला हाक मारली.

''...एऽपरशा, हिकडं ये.''

''काय गा?''

''लगीन होऊन किती वर्षं झाली रं?''

''एक.''

''आणि पोरं किती?''

''तीन.''

''भडव्या, मग पाच वर्सांत पंधरा पोरं हुतील की तुला. आँ ? काय रं हे !''

''जगात काय मलाच पोरं झाल्यात व्हय गा?''

''आरं, जगात सगळ्यांस्नीच पोरं हुत्यात. खरं; तीन पोरं एका डावाला तुलाच झाल्यात की. कोणच्या देवाला नवास केला हुतांस रं?''

खाली बघून परसू सरळ पुढं गेला.

मळ्यात झाडाबुडी जाऊन बसला. वर आंबं लागलेलं होतं. एकाएका घोसाला तीन-चार, तीन-चार आंबे. झाड लगडून गेलं होतं. उसातला मकाही चांगलाच पिकलेला होता. एकाएका ताटाच्या काखंत दोन-दोन, तीन-तीन कणसं. निदान परसूला तरी ती सारखी दिसत होती. एका विहिरीवरच्या तीन मोटा त्याला बघवेना झाल्या होत्या. पाटावरचं नारळीचं झाड तर आपल्या एका घोसाला पन्नास-साठ नारळ घेऊन उभं होतं... देवाची करणी नि नारळात पाणी.

परसूच्या डोसक्यात एकदम कसला तरी उजेड पडला आणि तो तडक घराकडं गेला.

म्हातारी आणि मंजा पोरांना वरचं दूध घालत बसल्या होत्या. एक पोरगं बाजूला रडत होतं. पांघरुणात होतं; हन्या त्यामुळं पोरगा होता की पोरगी होती; काही कळत नव्हतं.

दोघींना बघून परसू अचानक आत आला नि म्हणाला, ''यो समदा घोटाळा तुम्ही दोघांनीच केलासा.''

''कोणचा घोटाळा?''

"ह्यो ह्योच की, एक न्हवं, दोन न्हवं; तीन पोरं एका पेटाला तुम्ही माझ्या गळ्यात घोरपडीगत बांधलीसा."

"नशिबाचा खेळ हाय त्यो परसू !" म्हातारी समजुतीच्या सुरात म्हणाली.

"नशिबाचा खेळ कसला? तुम्हीच केलेला खेळ हाय ह्यो. तुम्ही दोघींनी दोन सवती सवती नवसं केलीसा. तुला पाहिजे हुती पोरगी आणि हिला पाहिजे हुता पोरगा. आणि मीबी तुमच्या मागं जाऊन सवतं नवस करून आलो. म्हणून हे तिरकूट जन्माला आलंय."

"खरं रं ऽऽ खरं." म्हातारी एकदम पिकलेल्या आंब्यागत झाली... "तसंच झालं असंल. वाडीचा देव मोठा न्यातीचा हाय. त्येनं तिघांचंबी खरं केलं बघ." "तरी बरं; हिच्या आई-बा ऽ नं वाडीला जाऊन नातवासाठी नवास केलं न्हाई. न्हाईतर कुत्र्यागत आमचा जलम झाला असता."

"हो ऽ ऽ बया ! काय तरी उगंच बोलतायसा." मंजा कधी नाही ते लाजली.

"तुला अजून गॉडच वाटतंय वाटतं ? गावात मला कोण तोंड वर करू देईना."

"परसू, झालं ते झालं. पदरात पडलं ते पुण्यवान झालं. कशाला उगंच वंगाळ वाटून घेतोस?"

दोघीवी लई शाण्या हाईसा तुम्ही. पर तुम्हांस्नी सांगून ठेवतो. जर का आता हितनं पुढं नवास - बिवास करायचं असंल, तर सगळी मिळून, एका इचारानं करत जावा. न्हाईतर तुझं एक न्यारंच, तर माझं निराळंच. तिकडं सासूचं निराळं, जावंचं निराळं; असं नगं व्हायला. न्हाईतर फुडच्या डावाला माझा समदाच घोटाळा करून ठेवशीला. कंदिलाची दोन-तीन भिंगं एकदम फुटावीत तशा जावा पाठीमागं खळखळून हासल्या नि परसूचा चेहरा तोंडाला काजळी लागलेल्या खुळ्यागत दिसू लागला.

❄ ❄ ❄